## महत्वाचे...



### चुलत भावंडांत वाद; गंभीर जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

निगडी येथील समर्थ नगर परिसरात पार्किंगच्या वादातून झालेल्या हल्ल्यात एक युवक गंभीर जखमी झाला आहे. ही घटना १ सप्टेंबर रोजी सकाळी अकराच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, समर्थ नगरमधील गुरुदत्त पे ॲण्ड पार्किंग येथे वाहन उभे करण्याच्या कारणावरून तुकाराम सखाराम काळभोर (वय ६०) यांनी नात्यातील व्यक्तीसोबत वाद घातला. त्यानंतर रागाच्या भरात त्यांनी लाकडी दांडा असलेल्या लोखंडी फावड्याने समोरील व्यक्तीच्या डोळ्याजवळील भागावर वार केला. या हल्ल्यात संबंधित जखमी युवकाच्या डाव्या डोळ्याच्या भुवईजवळ खोल जखम झाली असून त्याला तातडीने उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आले आहे. या प्रकरणी देहूरोड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### वर्गणीच्या नावाखाली खंडणी; गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

पिंपळे सौदागर येथील साईदिप लॉजिंगमध्ये गणपती वर्गणीच्या नावाखाली खंडणी उकळल्याप्रकरणी तिघांविरोधात काळेवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ३० ऑगस्ट रोजी मध्यरात्री साडेबारा वाजता घडली. मिळालेल्या माहितीनुसार, सचिन व अजय अशी दोनांची नावे समोर आली असून त्यांच्यासोबत आणखी एक अनोळखी इसम होता. हे तिघेही वयाने २५ ते ४५ वर्षांच्या दरम्यान असून, त्यांनी गणपती वर्गणीसाठी ५ हजार रुपयांची मागणी केली. त्याच वेळी पावती बुकमधून १२०० रुपयांची पावती देत फोनपेवरील क्रमांकावर पैसे पाठविण्यास सांगितले. पैसे न दिल्यास परिणाम भोगावे लागतील, अशी धमकी देत प्रत्यक्षात १२०० रुपये रोख उकळले. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रिव्हॉल्वरची स्वत:च्याच पायाला लागली गोळी

**पुणे । प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील कुरुळी गावात परवानाधारक रिव्हॉल्वरची निष्काळजीपणे हाताळणी केल्याने शेतकरी स्वत:च्या पायाला गोळी लागून गंभीर जखमी झाला. ही घटना २७ ऑगस्ट रोजी सकाळी अकरा वाजून साडेदहाच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, मयुर गुलाब सोनवणे (वय ३५, रा.सोनवणे वस्ती, कुरुळी) यांच्याकडे असलेला परवानाधारक रिव्हॉल्वर हाताळताना निष्काळजीपणा झाला. परवान्याच्या अटी-शर्तींचे पालन न करता रिव्हॉल्वर बाळगल्यामुळे अचानक गोळी सुटून त्यांच्याच डाव्या पायाला लागली. या घटनेत सोनवणे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी महाळुंगे एमआयडीसी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १२५(बी) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३० अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक राकेश गुमाने करीत आहेत.




**येरवडा : लक्ष्मण काशितकर यांच्या घरातील गौरी गणपती आरास मध्ये जेजुरीचा खंडोबा मूर्ती सादर केली होती.**

## वडारवाडीत तरुणावर हल्ला; एक जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

वडारवाडी परिसरात जुन्या भांडणाच्या कारणावरून तरुणावर आणि त्याच्या भावावर हल्ला झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे.

ही घटना १ सप्टेंबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास स्वामी समर्थ मंदिरासमोर, मुकेशनगर कमानीजवळ घडली. यामध्ये विशाल किरण पवार (२१, रा. वडारवाडी), अभिषेक संतोष माने (२४, रा. वडारवाडी – अटक) आणि इतर दोन आरोपींनी पीडित तरुणाची चौकशी चालू असताना त्याला व त्याच्या भावाला शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली.

# महापालिका शाळा ज्ञानासोबतच क्रीडा संस्कृतीतही आघाडीवर

## रग्बीमध्ये राज्यस्तरीय रौप्यपदक तर स्क्वॅशमध्ये विभागीय पात्रता महापालिका शाळांची दुहेरी कामगिरी

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. नुकत्याच शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत महापालिकेच्या शाळांनी रग्बी व स्क्वॅश या खेळांमध्ये ऐतिहासिक यश संपादन केले.

या स्पर्धेत कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्लिश मीडियम स्कूल, काळेवाडी येथील विद्यार्थी दया जाधव, अबुजर अन्सारी आणि सुमित गायकवाड यांनी पुणे जिल्हा रग्बी संघाचे प्रतिनिधित्व केले. या संघाने एकूण सात सामने खेळत राज्यस्तरीय स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आणि बीड संघाविरुद्धच्या चुरशीच्या लढतीत १-२ अशा फरकाने उपविजेतेपद पटकावले. पुण्याच्या वतीने झालेल्या या सामन्यातील एकमेव ट्राय दया जाधवने नोंदवत आपले क्रीडा कौशल्य दाखवून दिले. महापालिकेच्या शाळांमधून राज्यस्तरावर प्रथमच मिळालेले हे रौप्यपदक विद्यार्थ्यांसाठी तसेच शहरासाठी ऐतिहासिक ठरले आहे. तसेच श्रीमती अनुसयाबाई नामदेव वाघेरे इंग्लिश मीडियम स्कूल, पिंपरी येथील विद्यार्थ्यांनी स्क्वॅश या नव्याने समाविष्ट झालेल्या खेळात दमदार कामगिरी केली. सूरज मदने याने १४ वर्षाखालील गटात द्वितीय क्रमांक पटकावत रौप्यपदकासह विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. तर प्रथमेश कुंभार याने १७ वर्षाखालील गटात चौथा क्रमांक मिळवून विभागीय स्पर्धेत स्थान निश्चित केले. या यशामागे प्रशिक्षक सुशील सर यांचे मार्गदर्शन आणि शाळेचा सक्रिय पाठिंबा मोलाचा ठरला.

महापालिकेच्या शाळांमधून क्रीडा क्षेत्रात होत असलेली ही प्रगती विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रतीक असून, शहरातील क्रीडा संस्कृतीस नवी दिशा देणारी ठरत आहे.







> “महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात केलेली कामगिरी ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. या यशामुळे शालेय शिक्षणासोबतच खेळांच्या माध्यमातून सर्वांगीण विकासाला नवे बळ मिळत आहे. अशा यशस्वी पावलांमुळे महानगरपालिकेच्या शैक्षणिक कार्याला नवी दिशा मिळते.
> – प्रदीप जांभळे पाटील,
> अतिरिक्त आयुक्त (१), पिंपरी चिंचवड महापालिका

> “विद्यार्थ्यांची चिकाटी, परिश्रम आणि खेळाडूवृत्ती या यशामागे स्पष्टपणे दिसून येतात. असे उपक्रम आणि स्पर्धांमधील सहभाग विद्यार्थ्यांना नेतृत्व, संघभावना आणि आत्मविश्वासाची शिकवण देतात. त्यामुळे शाळा ही केवळ ज्ञानाचे केंद्र न राहता व्यक्तिमत्त्व घडविण्याचे व्यासपीठ ठरते. हेच संस्कार त्यांच्या पुढील वाटचालीस भक्कम पायाभूत ठरतील.
> – शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

> “महापालिका शाळा केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरत्या मर्यादित न राहता, क्रीडा व इतर उपक्रमांतूनही विद्यार्थ्यांना घडवत आहेत. हेच विद्यार्थी उद्याच्या स्पर्धात्मक जगात शहराचे प्रतिनिधित्व करतील. त्यामुळे शिक्षण विभागाचा सर्वांगीण विकासाचा उद्देश प्रत्यक्षात उतरत आहे. ही प्रक्रिया सतत सुरू राहावी, यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे.
> – किरणकुमार मोरे,
> सहायक आयुक्त, शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महापालिका

# वायसीएम रुग्णालयात अत्याधुनिक ट्रायेज व पुनर्जीवन सुविधा कार्यान्वित; आपत्कालीन सेवांना मिळणार बळकटी

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयाने आपत्कालीन विभागात अत्याधुनिक रुग्ण निवड आणि पुनर्जीवन सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. यामुळे आपत्कालीन सेवांना बळकटी मिळणार आहे. डाना टीएम फोर इंडिया लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते या नवीन सुविधांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी डाना टीएम फोर इंडिया लिमिटेडचे प्लांट हेड शिवाजी निळकंठ, एचआर व प्रशासन विभागाच्या प्रमुख योगिता सुषीर यांच्यासह रुग्णालयातील डॉक्टर्स, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नियोजित ट्रायेज सुविधेमुळे रुग्णांच्या प्रकृतीच्या गंभीरतेनुसार त्यांचे जलद मूल्यमापन आणि प्राधान्यक्रम ठरविणे शक्य होणार आहे. तर पुनर्जीवन सुविधेमुळे आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास मदत होणार आहे. गंभीर आजारी रुग्णांना जलद, प्रणालीबद्ध आणि उच्च गुणवत्तेची सेवा देण्यासाठी या सुविधा उपयुक्त ठरणार आहेत.



> “डाना टीएम फोर इंडिया लिमिटेड यांच्या सहकार्याने या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. तातडीच्या वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांची सेवा करण्याच्या रुग्णालयाच्या क्षमतेत यामुळे नक्कीच वाढ होईल.
> – डॉ. राजेंद्र वाबळे,
> अधिष्ठाता, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय

> “गरीब, बेघर आणि रोजगारासाठी राज्यातील इतर तसेच परराज्यातून आलेल्या रुग्णांना तातडीची मदत देण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय अविरत काम करते. या रुग्णालयाला सीएसआर फंडातून मदत करता आल्याचा खूप आनंद होत आहे.
> – शिवाजी निळकंठ, प्लांट हेड, डाना टीएम फोर इंडिया लिमिटेड

# चैन स्नॅचींगचे पाच गुन्हे उघडकीस; सात लाख किंमतीचा मुद्देमाल हस्तगत

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांपासून हडपसर व आसपासच्या परिसरात चैन चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. विशेषत: संध्याकाळी महिलांना लक्ष करून गर्दीच्या ठिकाणी चैन चोरी करण्यात येत होती. या वाढत्या गुन्ह्यांवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस आयुक्त यांनी अशा गुन्ह्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस उप-आयुक्त परिमंडळ पाच डॉ. राजकुमार शिंदे, यांनी देखील हडपसर पोलीस ठाण्यात बैठक घेवून संबधित अधिका-यांना गुन्हे उघडकीस आणण्यासाठी आवश्यक सूचना दिल्या.

या सूचनांनुसार हडपसर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, संजय मोगले, पोलीस निरीक्षक (गुन्हे) निलेश जगदाळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) अश्विनी जगताप यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथक अधिकारी व अंमलदार यांनी गुन्ह्यांचा बारकाईने अभ्यास केला. तपासातून असे दिसून आले की, चैन स्नॅचिंगचे गुन्हे हे रात्री साडे सात ते साडे नऊच्या दरम्यान पुणे सोलापूर रोडवरील गर्दीच्या ठिकाणी जसे शेवाळवाडी येथील भाजी मार्केट, महादेव मंदिर, गाडीतळ, हडपसर, मांजरी येथील गर्दीच्या ठिकाणी झाले असल्याचे दिसून आले. तसेच गुन्हा झाल्यानंतर पुणे सोलापूर हायवेने पसार होण्याची सोय असल्याने आरोपींना हा भाग निवडल्याचे निष्पन्न झाले.

गुरुवार रोजी तपास पथकाचे प्रभारी अधिकारी पोलीस उप-निरीक्षक हसन मुलाणी, सत्यवान गेंड व पोलीस अंमलदार हे पोलीस स्टेशन हद्दीत गर्दीच्या ठिकाणी पेट्रोलींग करीत असताना, पोलीस अंमलदार महावीर लोंढे यांना मिळालेल्या गोपनीय बातमीवरून आरोपी अनिकेत विजय चव्हाण (वय २४ वर्षे रा. सज्जनगड) व ज्ञानेश्वर भिकाजी चव्हाण (वय २३ वर्षे रा. खुणेश्वर ता. मोहोळ) यांना ताब्यात घेतले.



# महाळुंगे येथे कंपन्यांच्या सांडपाण्यामुळे १८ मेंढ्यांचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील महाळुंगे इंगळे गावात कंपन्यांनी बाहेर सोडलेल्या प्रदूषित सांडपाण्यामुळे तब्बल १८ मेंढ्यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. ही घटना १ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास एच. पी. चौकात हॉटेल कोर्टयार्डच्या मागील भागात घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक शेतकरी बाळु दामु कोकरे हे आपल्या मेंढ्यांना चारण्यासाठी आले असता, कंपन्यांतून सोडण्यात आलेले रसायनमिश्रित सांडपाणी विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानाच्या मोकळ्या जागेत व नाल्यात जमा झाले होते. या दूषित पाण्यामुळे १७ मादी व १ नर असे मिळून १८ मेंढ्यांनी पाणी प्यायल्यावर त्यांना उलटी, तोंडातून फेस येणे अशा लक्षणांनी त्रस्त होत मृत्यू झाला.

या घटनेत कोकरे यांचे अंदाजे २ लाख ५० हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. कंपन्यांच्या प्रशासनाने दूषित पाणी सोडल्यास त्यातून माती, पाणी व हवा प्रदूषित होईल, पर्यावरणाची हानी होईल, तसेच प्राणी अथवा माणसांचा जीव जाऊ शकतो, याची जाणीव असूनही निष्काळजीपणा केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी महाळुंगे एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. आरोपी अद्याप अटकेत नाही. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अनिस मुल्ला करत आहेत.

# लोहगाव विमानतळाच्या पंधरा १५ कि.मी. अंतराच्या परिघामध्ये बीम लाईट व लेझर बीम लाईटला प्रतिबंध

**पुणे । प्रतिनिधी**

लोहगाव टेक्नीकल विमानतळ व नागरी विमानतळ येथे दिवसा व रात्रौ वेगवेगळ्या एअर लाईन्सची व भारतीय वायु सेनेचे विमाने व हेलिकॉप्टर उतरत असतात व उड्डाण करीत असतात. रात्रीचे वेळी वैमानिकांना दिशा व ठिकाण दाखविण्यासाठी रनवे वर व एटीसी टॉवरकडून संकेतासाठी लाईटचा उपयोग करण्यात येतो.

भारतीय वायुसेनांनी असे निदर्शनास आणुन दिले आहे की, लोहगाव विमानतळाचे वायुक्षेत्राचे जवळच्या परिसरात तसेच पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात विविध कार्यक्रमाच्या वेळेस आकाशामध्ये प्रखर बीम लाईट व लेझर बीम लाईट चा उपयोग करण्यात येतो.

अशा प्रखर बीम लाईट व लेझर बीम लाईट मुळे वैमानिकाचे डोळे दिपून दुर्घटना होण्याची शक्यता आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारान्वये लोहगाव वायुसेना व नागरी विमानतळाच्या साधारणपणे १५ कि.मी. अंतराच्या वायुक्षेत्र परिघामध्ये व पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात खालील कृत्यांवर प्रतिबंध करण्यात येत आहे. कोणत्याही व्यक्तीने किंवा कार्यक्रम आयोजकांनी प्रखर बीम लाईट व लेझर बीम लाईट आकाशात सोडू नये. सदरचा आदेश दिनांक ०७/०९/२०२५ रोजी पासून ६० दिवसा करीता अंमलात राहील.

सदरच्या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील असे पोलीस सह. आयुक्त रंजन कुमार शर्मा यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्पवृष्टी करून भव्य स्वागत

**पिंपरी । प्रतिनिधी**

आयटीआयचे प्रशिक्षण सत्र २०२५ -२६ नव्याने सुरू झाले असून दिनांक २ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांनी संस्थेमध्ये उपस्थित राहण्याचा पहिलाच दिवस होता. प्रवेशित झालेले सर्व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते, त्यावेळी सर्व विद्यार्थ्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. पुष्पवृष्टी करून त्यांना प्रोत्साहित करण्यात आले व भेटवस्तू देण्यात आली.

शशिकांत पाटील प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना तसेच उपस्थित राहिलेल्या पालकांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे महत्त्व सांगितले. आयटीआय संस्था, केंद्र शासन, कौशल विकास व उद्योजकता मंत्रालय, डीजीटी यांच्या अखत्यारीत संपूर्ण कामकाज चालत असल्याबाबत माहिती दिली तसेच सर्व ट्रेडसच्या विद्यार्थ्यांना रोजगार करिता तसेच स्वयंरोजगार करिता उज्वल भविष्य असल्या बाबत नमूद केले. महापालिकेने टाटा मोटर्स सोबत डीएसटी अंतर्गत करार केला आहे. गटनिदेशक किसन खरात यांनी विद्यार्थ्यांना संस्थेचे नियमावली, विद्यार्थ्यांचे हजेरीचे महत्व तसेच शिस्त पालन बाबत मार्गदर्शन केले. सर्व निदेशक यांनी प्रत्येकाचे नाव ओळख व ट्रेड बाबत माहिती सांगितली. सदर कार्यक्रमास संस्थेतील सर्व निदेशक, गटनिदेशक, कार्यालय अधीक्षक व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. प्रशिक्षणाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांसोबत पालकही उपस्थित राहिल्यामुळे त्यांचेही आभार व्यक्त करण्यात आले.





# पुणे मेट्रो टप्पा २ मध्ये बालाजीनगर, बिबवेवाडी ही दोन नवीन स्थानके

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-२ च्या विस्तारित मार्गावर स्वारगेट ते कात्रज या कॉरिडॉरवर दोन नवीन स्थानके उभारण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे. बालाजीनगर व बिबेवाडी येथे ही दोन मेट्रो स्थानके उभारली जाणार असून त्यासाठी येणाऱ्या ६८३.११ कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चास तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे.

पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प टप्पा-२ च्या विस्तारित मार्गावर स्वारगेट ते कात्रज या कॉरिडॉरवर दोन नवीन स्थानके उभारण्याच्या निर्णयामुळे पुणे शहरातील दक्षिण भागातील नागरिकांसाठी मेट्रो प्रवास अधिक सुलभ होणार असून वाहतूक कोंडी कमी करण्यास मोठी मदत होणार आहे. उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला आहे. या प्रकल्पासाठी पुणे महानगरपालिकेचा २२७.४२ कोटी रुपये, ‘ईआयबी’चे द्वीपक्षीय कर्ज ३४१.१३ कोटी रुपये, तर राज्य करांसाठी राज्य शासनाचे दुय्यम कर्ज ४५.७५ कोटी रुपये व व्याज रक्कमा राज्य शासनाचे अतिरिक्त बिनव्याजी दुय्यम कर्ज ६८.८१ कोटी रुपये अशा मिळून एकूण ६८३.११ कोटी रुपयांच्या अतिरिक्त खर्चास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.